**सहायक आयुक्त, अकोला महानगरपालिका**
**<u>या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीबाबत..</u>**
**श्रीमती वसुधा फड, मुख्याधिकारी, गट-ब.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०१६/प्र.क्र.५/नवि-१४**
मंत्रालय(मुख्य इमारत), ४ था मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०७ जानेवारी, २०१६

**आदेश**

श्रीमती वसुधा फड, मुख्याधिकारी, गट-ब या सध्या सहायक आयुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर या पदावर कार्यरत असून, त्यांची प्रशासकीय कारणास्तव सहायक आयुक्त, अकोला महानगरपालिका, अकोला या रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

२. श्रीमती वसुधा फड हे ज्या तारखेला सहायक आयुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर या पदाचा कार्यभार सुपूर्द करतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ज्या तारखेला आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्विकारतील त्या तारखेला समाप्त होईल. प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी श्रीमती वसुधा फड यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

अ) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनास आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

ब) जर त्यांची सेवा स्वीयेतर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्यांना नगर विकास विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वियेतर नियोक्त्याला राहील.

क) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला दिल्यानंतर त्यांना नगर विकास विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

३. ही प्रतिनियुक्ती महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील खालील अटी व शर्ती यांच्या अधीन राहून करण्यात येत आहे. श्रीमती फड यांना प्रतिनियुक्तीच्या काळातील प्रदाने नियमानुसार लागू राहतील.

४. श्रीमती वसुधा फड, सहायक आयुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर यांना कार्यमुक्त करण्याची विनंती आयुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर यांना करण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०५१६५२१२६८२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jayasingrao N Patil

Digitally signed by Jayasingrao N Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jayasingrao N Patil
Date: 2016.01.07 15:36:11 +05'30'

**( ज.ना.पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग / अमरावती विभाग.
४. महापौर, लातूर महानगरपालिका, लातूर.
५. महापौर, अकोला महानगरपालिका, अकोला.
६. आयुक्त, लातूर महानगरपालिका, लातूर.
७. आयुक्त, अकोला महानगरपालिका, अकोला.
८. कार्यासन (नवि-२४)/ (नवि-२६), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती/ नवि १४.